## पुस्तक परिचय/परीक्षण

# गीता चिकित्सेच्या निमित्ताने

भागवद्गीता हा ग्रंथ मी वाचायला घेतला तेव्हा मी १७-१८ वर्षांचा असेन. बी. ए. च्या तत्त्वज्ञान विषयाकरिता आम्हाला ईश्वरकृष्णांची सांख्यकारिका होती. आणि त्यानिमित्ताने आमचे प्रोफेसर कै. श्री शंकरराव फाटक यांनी आम्हाला गीता वाचावयास सांगितली. चिपळूणकरमंडळींनी प्रसिद्ध केलेले महाभारताचे भाषांतर मी वयाच्या बारा तेराव्या वर्षीच वाचले असावे. पण हे वाचताना तत्त्वज्ञानाचा भाग अर्थातच बाजूस ठेवला होता. सुरुवातीस जेव्हा मी गीता वाचली तेव्हा गीतेत काही तत्त्वज्ञान आहे आणि तो तत्त्वज्ञानावरील महान ग्रंथ आहे या पार्श्वभूमीवर मी तो वाचलाच नाही. त्यात सांख्ययोग, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा यांचे खंडन मंडन आहे अशा दृष्टिकोनातून मजकडून गीता वाचलीच गेली नाही. 'गीता' हा महाभारत या काव्याचा भाग आहे अशीच माझी धारणा होती. (माझी ही समजूत अद्यापही कायम आहे.) त्यामुळे महाभारतात गीतेकरिता व्यासांनी अठरा अध्याय का खर्ची घातले असा प्रश्न माझ्या मनात ठाण देऊन उभा होता. मी समजत होतो ते हे की या काव्यात व्यासांना अर्जुनाला युद्धास प्रवृत्त करायचे होते आणि श्रीकृष्णाच्या मध्यस्थीतून त्यांनी ते पार पाडले. त्याकरिता इतर ऐतिहासिक संदर्भांबरोबरच भारतातील निरनिराळ्या तत्त्वज्ञानांचे पण त्यांनी दाखले घेतले. उदाहरणार्थ ऐहिक आणि पारलौकिक सुख मानणाऱ्या पूर्वमीमांसेचा दाखला घेऊन, 'तू युद्धात जिंकल्यास तर तुला पृथ्वीचे राज्य मिळेल आणि जर मारला गेला तर स्वर्गाचा लाभ होईल.' अशाच प्रकारे सांख्ययोग, मीमांसा इत्यादी तत्त्वज्ञानावर आधारलेल्या औषधांची गुटिका श्रीकृष्णांनी अर्जुनाला पाजली असावी. श्री भागवद्गीतेला जरी प्रस्थानत्रयीमध्ये स्थान मिळाले असले तरी गीतेसंबंधीचा माझा दृष्टिकोन हा केवळ काव्यविषयकच होता. कोण-

त्याही काव्यात तत्त्वज्ञानविषयक मतांची पेरणी करता येते. अगदी इसापनीती आणि पंचतंत्राच्या कथांतसुद्धा, असे माझे मत होते. आणि ह्याच दृष्टिकोनातून मी गीतेकडे पाहात होतो, त्यामुळे महाभारतासारख्या महाकाव्येतिहासात श्रीव्यासांनी गीतेचे अठरा अध्याय का खर्ची घातले हे मला कळलेच नाही. काव्यात तत्त्वज्ञानाचे दृष्टांत देणे ह्यात मला काही गैर वाटत नाही. पण अध्यायचे अध्याय तत्त्वज्ञानावरच खर्च करणे म्हणजे काव्याला सूज आणण्यासारखे आहे, असे मला वाट. गीताग्रंथ हा समरांगणावर सांगितला असे गीताच सांगते. त्यामुळे ह्या अठरा अध्यायांचा 'प्रपंच' तेथे झाला असेल हे खरोखरच संभवत नाही पण रणांगणावर उभे ठाकले असताना युद्ध करावे की करू नये अशी आशंका योद्धयाच्या मनात येऊ शकते आणि अशा शंकेतून नीतिशास्त्राचे प्रश्नही उत्पन्न होऊ शकतात.

प्लेटोचे वाचन करीत असताना 'क्रिटो' नामक संवादात सॉक्रेटिसच्या हेमलॉक प्राशनाचा प्रसंग आहे. सॉक्रेटिसचे काही मित्र तुरुंगात येतात आणि सॉक्रेटिसला, 'तू तुरुंगातून पळून चल' असे सांगतात. त्यांनी बहुधा तशी व्यवस्था केली असते. त्यावेळी सॉक्रेटिस, व्यक्तीचे काय कर्तव्य असते आणि शासन संस्थेचा आदेश नागरिकांनी कसा पाळला पाहिजे ह्यावर एक व्याख्यान देऊन हेमलॉकचा पेला तोंडाला कसा लावतो ह्याचे मार्मिक वर्णन आहे. भीष्मपर्वातील, गीताउपपर्वातील प्रसंग असाच नैतिक, सामाजिक प्रश्न उत्पन्न करणारा आहे. कर्तव्याच्या आड आप्त, स्वकीय आले तरी त्यांची गय करता कामा नये, असा गीतेचा निष्कर्ष मी काढू शकत होतो. पण गीता हा सारी उपनिषदे घुसळून श्रीकृष्णांनी काढलेला नवनीताचा गोळा आहे, हे मात्र मला कधीच समजले नाही. सारी उपनिषदेच घुसळावयाचे कारण काय हेच मला कधी समजले नाही. पुढे भारताचार्य चिं. वि. वैद्य यांचे 'महाभारताचा उपसंहार' हे पुस्तक माझ्या वाचनात आले त्यावेळी महाभारताची जय, भारत आणि महाभारत ही तीन रूपे आहेत ही गोष्ट मला पहिल्यांदा जाणवली आणि गीता ही व्यासांची की वैशंपायनांची की सौतींची असा प्रश्न मी माझ्या गुरुजनांना विचारला. गुरुजनांनी गीता ही व्यासांचीच असे उत्तर दिल्यामुळे माझ्या गोंधळात भरच पडली. पुढे डॉ ग. श्री. खैर आदि गीतातज्ज्ञांनी गीतेतही अनेक प्रक्षिप्त गोष्टी आहेत असे लिहिल्यामुळे गीतेचे सर्वच भाग व्यासप्रणीत नसतील असे मी धरून चाललो. गीतेचेही अनेक पाठ आहेत हे मला कालांतराने कळले. एका काश्मीर प्रतीत आपल्याला माहीत असलेल्या पाठापेक्षा गीतेचा पाठ वेगळा आहे, असे मला माझ्या एका काश्मिरी मित्राने सांगितले. अर्थात गीतेवर संशोधन करावयाचे नसल्यामुळे या गीतापाठाबद्दल मला मिळालेली माहिती माझ्या स्मृतीतच अडकून पडली. आदरणीय भाऊ धर्माधिकारी ह्यांचा 'गीता–चिकित्सा' हा ग्रंथ वाचत असताना या निरनिराळ्या

आठवणींची, जाणीवांची पुन्हा उजळणी झाली म्हणून हा सारा भाग मी लिहिला. माझ्या मनात उद्‌भवलेल्या अनेक शंका भाऊ धर्माधिकारी यांच्याही मनात उद्‌भवल्यात आणि त्यांची उत्तरे शोधण्याचा त्यांनी या ग्रंथात प्रयत्न केला ही महत्त्वाची गोष्ट. गीतापाठावरील असे महत्त्वाचे संशोधन मला धर्माधिकारी यांच्या ग्रंथात प्रथमच पाहावयाला मिळाले हे मला प्रांजळपणे सांगितले पाहिजे. त्याचा अर्थ असा नव्हे की त्यांच्या सर्वच मुद्द्यांवर माझे त्यांच्याशी एकमत असेल. पण त्यांचे बोट धरून जाताना गीतेवरील माझ्या शंकांचा अर्थ अधिक सुस्पष्ट झाला हे तर निश्चितच पण गीतेकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन रूढार्थाने धार्मिकतेचा नाही. तसे भाऊ धार्मिक आहेत. पण नीरक्षीरविवेक करताना ते आपली धार्मिकता बाजूला ठेऊ शकतात, ही महत्त्वाची गोष्ट त्यांच्या ग्रंथावरून दिसते.

'चिकित्सेमागील माझी भूमिका' ह्या प्रकरणात भाऊ सांगतात, "गीतेच्या चिंतनातून पहिले दर्शन मला हे झाले की गीतेत एकच विषय सांगितला नाही" (पृष्ठ २) धर्माधिकारी ह्यांच्या मनात आलेला दुसरा विचार हा की 'गीता ही एका व्यासाची कृती नसून ती अनेकांची कृती असावी.' (पृष्ठ ३) त्यांच्या मनात आलेला तिसरा विचारही तितकाच महत्त्वाचा आहे– "अशा ह्या ग्रंथातून सामान्य माणसाला निर्विवादपणे जीवन–साफल्याचा एक निश्चित मार्ग, एक निश्चित साधन सापडावे अशी सहाजिक अपेक्षा होती. पण माझ्यासारख्या भाविक भक्ताची तशी अपेक्षा सफल झाली नाही, ह्या अर्थाने की त्यातून आपले जीवनसाध्य अमुक आणि ते अमुक मार्गाने साध्य करायचे असे निश्चित मार्गदर्शन झाले नाही. गीतेत जीवनाचे साध्य कोणते सांगितले आहे ? चातुर्वर्ण्यानुसार नियत कर्म करीत राहाणे, की बुद्धियोग साधणे म्हणजे स्थितप्रज्ञ होणे, की नैष्कर्म्य–सिद्धी प्राप्त करून मोक्ष साधणे की ध्यानसमाधीत आत्म–दर्शन करणे, की भक्त होऊन आपल्या दैवताला आत्मनिवेदन–आत्मसमर्पण करणे ?" (पृष्ठ ६)

त्यांनी केलेले दोन प्रकारच्या श्रद्धांचे वर्गीकरणही फार महत्त्वाचे आहे आणि त्यातून त्यांना जे स्फुरले ते हे की लोकमान्यांना जर गीतेचे स्वतंत्रपणे संशोधन करता येते तर ते कोणालाही करता यावे. ती अनधिकारचेष्टा ठरू नये. ह्या भूमिकेतून भाऊ धर्माधिकारी ह्यांनी आपला ग्रंथ लिहिलेला आहे.

त्यांच्या परिपक्व विचारातून त्यांना जी गोष्ट दिसून आली ती ही की अर्जुनाचा विषाद व त्यावर श्रीकृष्णाचा बोध ह्या विषयाचा आधार घेऊन जणू अनेक तत्त्ववेत्त्यांनी आपआपल्या तत्त्वज्ञानाचा ऊहापोह केला व तो एकत्र करून हा ग्रंथ तयार

झाला. भाऊ म्हणतात, " अठराव्या अध्यायाच्या ६७ ते ७१ ह्या श्लोकात फलश्रुतीच्या रूपाने जे सांगितले त्यावरून हा प्रासंगिक बोध नसून ती एक संपूर्ण ग्रंथरचनाच आहे, हे स्पष्ट दिसते." ह्या संकलनातील निरनिराळे तत्त्वज्ञानाचे विषय, निरनिराळ्या प्रतिपादकांचे असून ते कुणीतरी एकत्र करून शेवटचा उपसंहारात्मक अठरावा अध्याय रचला असावा असे त्यांना वाटते. तसेच त्यांना असेही वाटते की समग्र गीता–प्रकरण महाभारतातून काढून टाकले तरी त्यातील घटनाकथनाला कुठेही बाधा पोचत नाही. (पृष्ठ १४) भाऊंचे हे विवेचन कोणासही विचार करायला लावील ह्यात शंका नाही.

गीतेचा समारोप करण्याचे काम व्यासशिष्य वैशंपायन ह्यांनी केले असावे असा त्यांचा तर्क आहे. ते पण खरे असू शकते. पण अठराव्या अध्यायाचे आणखीही काही पाठभेद खरोखर आहेत काय हे पण एकदा तपासून पाहिले पाहिजे. माझे एक कौलमतानुयायी मित्र गीतेचा अठरावा अध्याय काश्मीरात वेगळाच आहे असे सांगत होते हे मी वर सांगितलेच आहे पण माझी त्यांची पुन्हा भेट न झाल्यामुळे मला ह्याबद्दल काहीही निश्चित सांगता येत नाही. पण अठराव्या अध्यायात आणि इतर अध्यायातील दृष्टिकोनात मलाही काही विसंगती आढळल्या. उदाहरणार्थ अठराव्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात, ' जरी कुणी अति दुराचारी असेल पण माझा भक्त असेल तरी मी त्याला सर्व पापांपासून मुक्त करीन.' ही गोष्ट गीतेच्या इतर काही अध्यायांतील दृष्टिकोनाशी मला विसंगत वाटते. त्यामुळे भगवद्गीता हा स्वतंत्र ग्रंथ असून त्याचे भाग महाभारतात नंतर कोंबले गेले हे खरे असू शकते. आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ धर्माधिकाऱ्यांनी शांतिपर्वाच्या ३३७ अध्यायातील काही भाग उद्धृत केला आहे. सुमंतु, जैमिनी, पैल आणि व्यास–पुत्र शुक हे एकत्र राहून भारताचा अभ्यास आणि उजळण्या करीत होते अशा अर्थाचा हा भाग आहे. गीतेचा पहिला अध्याय म्हणजे भीष्मपर्वाचा पंचवीसाव्वा अध्याय. चोवीसाव्या अध्यायातच धृतराष्ट्र संजयाला कुरुक्षेत्रावर युद्धाबद्दल विचारतो. पण गीतेच्या पहिल्या अध्यायात ह्याच गोष्टीची पुनरुक्ती आहे. " धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः । मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ?।।" भीष्मपर्वाच्या त्रेचाळीसाव्या अध्यायात अशाच काही महत्त्वाच्या गोष्टी भाऊंना दिसल्या आहेत आणि त्यावरून त्यांनी हा निष्कर्ष काढला आहे की मूळ भीष्मपर्वात चोवीसाव्या अध्यायानंतर त्रेचाळीसावा अध्याय येत असावा. पण ह्याच ठिकाणी गीतेची अठरा प्रकरणे घातली गेली आहेत. गीता प्रकरणाने हा प्रवाह अडल्यासारखा वाटतो हे मागचा अनुबंध व पुढचा संबंध पाहणाऱ्यांना सहज पटेल. ह्या ठिकाणी भारताचार्य चिं. वि. वैद्य ह्यांचा आधार भाऊ धर्माधिकारी

आपल्या मताच्या समर्थनार्थ घेतात. त्यातील महत्त्वाचे मुद्दे असे—

१. भगवद्गीता हा ग्रंथ अनेकांच्या रचनेतून तयार झाला.

२. गीतेत आलेले तत्त्वज्ञान साक्षात् श्रीकृष्णाच्या तोंडचे नसेलही. ते व्यासांनी किंवा वैशंपायनांनी श्रीकृष्णाच्या तोंडी घातले.

धर्माधिकाऱ्यांनी काढलेले निष्कर्ष फार महत्त्वाचे आहेत. त्यामुळे भगवद्गीता मूळ महाभारताचा भाग असो वा नसो, व्यास किंवा व्यास-शिष्यांनी रचलेला भगवद्गीता हा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे आणि ह्या दृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे, हा धर्माधिकारी ह्यांचा अभिप्राय मला महत्त्वाचा वाटतो. धर्माधिकारी ह्यांनी मांडलेला आणखी एक मुद्दा महत्त्वाचा आहे. अर्जुनाला 'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ' असा उपदेश केल्यानंतर आणि अर्जुन युद्धाला तयार झाल्यावरही भीष्मार्जुन युद्ध प्रसंगात अर्जुनाचे अवसान गळते आणि तो भीष्माशी लढाईच करत नाही. त्यावेळी 'न धरी शस्त्र करी मी' अशी श्रीकृष्णाची प्रतिज्ञा असतानासुद्धा कृष्ण भीष्मावर चाल करून जातो. द्रोणयुद्धामधेसुद्धा अर्जुनाची हीच स्थिती होते

गीतोपदेशाचा अर्जुनावर चिरकाल टिकणारा परिणाम होताना दिसत नाही. त्यामुळे गीता हे प्रकरण मुळात व्यासांचे नसावेच हे श्री. धर्माधिकारी ह्यांचे म्हणणे विचार करण्यास लावणारे आहे. मात्र ह्या विवेचनावरून गीता व्यासाची नाहीच हे मात्र सिद्ध होऊ नये. एखादे ज्ञान झाल्यावर माणूस मोहाला बळी पडू नये असा काही मनुष्याच्या वागणुकीचा नियम असू शकत नाही.

दुसऱ्या प्रकरणात श्री. धर्माधिकारी अर्जुनविषादाची चिरफाड करण्याचा प्रयत्न करताना. अर्जुन हा फार मोठा योद्धा होता असे चित्र तर व्यासांनी रंगविले आहेच. त्याचा पिंडही युद्ध करण्याचाच असतो. हस्तिनापुरातून शिष्टाई करून परत आल्यावर दुर्योधनाशी कौरव समेट करण्याच्या परिस्थितीत मुळीच नाहीत असे श्रीकृष्ण जेव्हा सांगतो तेव्हा युधिष्ठिराला दुःख होते. तो म्हणतो जे अवध्य आहेत त्यांचा आता वध करावा लागणार. त्यावेळी कुंती आणि विदूर यांच्याप्रमाणेच 'युद्धावाचून आपल्याला न्याय मिळणार नाही' असे अर्जुनही म्हणतो. तसेच इतर प्रसंगी कौरवांच्या घमेंडीला 'मी गांडीवानेच उत्तर देईन' अशीच अर्जुनाची प्रतिक्रिया असते. अर्जुनाने कौरवांशी प्रत्यक्ष युद्ध केले नव्हते असेही नाही. गोग्रहण पर्वात एकटा अर्जुनच भीष्म, द्रोण, कर्ण आणि सर्व कौरव ह्यांच्याशी युद्ध करून त्यांचा पराजय करीतच असतो. पण अशा वीराच्या मनात

युद्धातून काही निष्पन्न होणार नाही असा विचार येऊच नये असे मात्र मला वाटत नाही. क्षत्रियाने नेहमी क्षत्रियधर्मच समोर ठेवून काम केले पाहिजे आणि तो तसेच करतो ही गोष्ट मला तितकीशी पटणारी नाही. महाभारत आणि भगवद्गीता ह्यांच्या एकंदर दृष्टिकोनांत फरक आहे, हे जरी खरे मानले तरी प्रत्यक्ष सैन्य पाहिल्यावर त्यातून काय निष्पन्न होईल असा विचार अर्जुनाच्या मनात आल्यास त्यात वावगे काय आहे ?

श्रीकृष्णाने आपला उपदेश मात्र क्षत्रिय धर्मालाच पुढे ठेऊन केलेला आहे हे धर्माधिकारी ह्यांचे म्हणणे बरोबर दिसते.

पुढील दोन-तीन प्रकरणात धर्माधिकारी श्रीकृष्ण चरित्राचाच मागोवा घेतात. श्रीकृष्णाला महाभारत युद्ध पाहिजे असेच दिसते. त्यातून त्याला काय साधावयाचे असते हे मात्र कळत नाही. तो तर धर्म संस्थापनाचीच भाषा बोलतो. पण अशा युद्धातून धर्म संस्थापना झाल्याचे मात्र दिसत नाही. त्यातून श्रीकृष्णाच्या मुत्सद्दीपणाचा मात्र प्रत्यय येतो. साम्राज्य मग येते जरासंघाचे असो की कंसाचे की कौरवांचे ते मोडीत काढण्याचाच त्याचा प्रयत्न असतो. ज्याप्रमाणे चाणक्याने चंद्रगुप्ताला हाताशी धरून नंद साम्राज्याचा नाश केला तसाच पांडवांना हाताशी धरून निरनिराळ्या साम्राज्यांचा नाश करावयाचा श्रीकृष्णाचा हेतू दिसतो. त्यातूनच भारतात क्षत्रियधर्माचे रक्षण, स्त्रीचे रक्षण अशासारखे प्रश्न उत्पन्न होतात असे मला वाटते. श्रीकृष्ण स्वत: महान योद्धा आहे, धर्म सांगणारा आहे, सामाजिक प्रश्नाची जाण असणारा आहे. त्यामुळे धृतराष्ट्र, गांधारी, कुंती, विदुर, द्रौपदी आणि पांडव ह्या सर्वांना तो आपली मते पटवून देऊ शकतो. असा हा श्रीकृष्ण कौरव-पांडवात समेट घडवून आणण्याकरिता शिष्टाई करण्यासही जातो. पण त्या शिष्टाईतून काही निष्पन्न होणार नाही हेही त्याला माहीत असते. अंगच्या ह्या सर्व गुणांमुळे कोणताही मोह किंवा भीड न ठेवता आपले मत निर्भयपणे आणि स्पष्टपणे सांगणे श्रीकृष्णाला जमते आणि पांडव कृष्णाच्या तालावर कळसूत्री भावल्यांप्रमाणे वागताना दिसतात. गीताचिकित्सेच्या सहाव्या प्रकरणात जयद्रथ वधाचे वेळीं कृष्णाने योग-बलाने योग-माया निर्माण केली असा उल्लेख पहिल्यांदा येतो. भाऊ त्याचा उल्लेख करतात. या भाग प्रक्षिप्त असावा असे त्यांना वाटते आणि ते बरोबरही असू शकते. पण कृष्णाजवळ योग-माया असो किंवा नसो तो अत्यंत दूरदृष्टीचा आणि मोठा धोरणी होता ह्यात शंकाच नाही. कर्णाजवळची शक्ती काढून घेण्याकरिता त्याने घटोत्कचाला पुढे सारले आणि कर्णाने त्याला मारल्यानंतर श्रीकृष्ण खूप आनंदित झाला कारण इंद्राने दिलेली शक्तीही घटोत्कचवधामुळे संपली ही गोष्टही कृष्णाच्या दूर-धोरणाबद्दल सगळे काही सांगून जाते. कृष्ण महाबुद्धिमान

आणि महाज्ञानी होता ह्यात शंकाच नाही. असा हा कृष्ण, युधिष्ठिर आणि अर्जुन ह्यांच्यात बोलाचाली होते तेव्हा अर्जुनाला सांगतो की, तू वडील माणसावर क्रोध करीत आहेस हे ठीक नाही, आणि त्या निमित्ताने धर्म म्हणजे काय हेही तो विशद करतो. ज्या गोष्टीत समाजाची धारणा करण्याचा गुण आहे तो धर्म आणि असा गुण अहिंसेत आहे असेही तो बोलतो. हे सर्व वर्णन प्रक्षिप्त आहे असे भाऊंचे मत आहे.

ह्यामुळेच गीतेच्या एका अध्यायात 'अहिंसा सत्यम् अक्रोधः त्यागः शान्ति-रपैशुनम्' असे जेव्हा श्रीकृष्ण सांगतो तेव्हा भाऊंना कृष्णाच्या प्रत्यक्ष आचारात एक विसंगती दिसते. साक्षात योगेश्वरांच्या तोंडातून निघालेला बोध असे गीतेचे माहात्म्य मानले जात असल्यामुळेच भाऊ कृष्णाच्या चरित्राचा मागोवा घेतात, श्रीकृष्ण चरित्राचा हा मागोवा भाऊ एवढ्याकरिता घेतात की त्यामुळे गीतेकडे पाहण्याची एक वास्तव-दृष्टी येईल असे त्यांना वाटते. श्रीकृष्णाच्या चरित्राचा वेध घेण्याचे आणखी एक कारण हे की, गीतेतील तत्त्वबोध कुणी केला यावर त्याची गुणवत्ता न ठरविता काय बोध केला ह्यावर ती ठरवणे योग्य होईल असेही त्यांना वाटते आणि ह्या दृष्टिकोनातून ते गीता-चिकित्सा करतात. हे सर्व करीत असताना सांख्य शब्दाचा जो अर्थ त्यांनी लावला तोही महत्त्वाचा आहे. 'संख्य' म्हणजे युद्ध आणि त्यामुळे सांख्य म्हणजे युद्धविषयक असा अर्थ ते घेतात. असा अर्थ घेतल्या-बरोबर गीतेकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टिकोनातच फरक पडतो. सांख्य शब्दा-प्रमाणेच त्यांनी योग शब्दाचीही अशीच चीरफाड केली आहे. त्यामुळे बुद्धियोग शब्दावरही नवीन प्रकाश पडतो.

भारतातील प्राचीन आर्यांची 'समाज-व्यवस्था' ही चातुर्वर्ण्यावर आधारलेली होती असे इतर अनेक पंडितांप्रमाणे धर्माधिकारी ही मानतात. स्वतः श्रीकृष्णच म्हणतात, 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' मनुस्मृतीमध्येही चातुर्वर्ण्याचा उल्लेख आहेच. जैन ग्रंथातही पहिला तीर्थंकर ऋषभदेव ह्यांनी क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र वर्ण निर्माण केले आणि ऋषभपुत्र भरत चक्रवर्ती ह्यांनी ब्राह्मण वर्ण उत्पन्न केला असा उल्लेख आढळतो. परंतु वर्ण अशा प्रकारच्या प्रयत्नातून निर्माण होत नाहीत हे कुणीही समाजशास्त्रज्ञ सांगेल. कैक हजार जाती-जमाती आणि टोळ्या ह्यांनी वसलेल्या ह्या देशातील लोकात एकजीनसी व्यवस्था निर्माण करण्याच्या हेतूत चातुर्वर्ण्याची सूचना आहे, बहुजिनसी समाजाला हा एकजिनसी करण्याचा प्रयत्न या शिफारसीमध्ये आहे. समाजाच्या गर्भात जे शक्य असेल ते समाजातही उतरू शकते एवढाच त्याचा अर्थ आहे. त्यामुळे श्रीकृष्णाला ड्रेस पाडून त्यांच्या तोंडून योग्य कोणते आणि अयोग्य कोणते हे खरोखरच सांगायची

आवश्यकता नव्हती. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने बुद्धियोग सांगणाऱ्यांनी तरी असे काही सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे गीतेचे तत्त्वज्ञान हा एक काव्याचा विषय आहे असेच मला आजही वाटते आणि ह्या काव्यविषयावर मागाहून तत्त्वज्ञानाचे लेप चढविले गेले असले पाहिजेत असे मी समजतो. अर्थात बुद्धीच्या अशा लेपाचा उपयोग आहे आणि असा उपयोग गीतेच्या भाष्यकारांनी करून घेतला आहे असेही दिसून येते. धर्माधिकारी म्हणतात त्याप्रमाणे आज चातुर्वर्ण्य व्यवस्था राहिलेली नाही. जेव्हा ती असेल तेव्हा वर्णानुसार कर्म करणे हे अधिक सोपे असेलही पण आज ' बुद्धियोगाचे लाभ वैयक्तिक उन्नतीच्या तसेच सामाजिक कल्याणाच्या दृष्टीनी खचित उपेक्षणीय नाहीत ' हे मनाला पटते. गीतेत दाखविण्यात आलेल्या अर्जुनाच्या शंका ह्या ' व्यासनिर्मित अर्जुनाच्या नसून व्यास शिष्यांनी आपल्या तत्त्वचर्चेकरिता निमित्ताला घेतलेल्या अर्जुनाच्या आहेत '- ही गोष्ट भाऊंनी निश्चितच सिद्ध केली आहे.

तसेच गीतेच्या निरनिराळ्या अध्यायांत जो विचार मांडलेला आहे त्यावरून दुसऱ्या तिसऱ्या आणि इतर अध्यायांचे कर्ते हे वेगळे असू शकतात असे जे भाऊ मानतात ते मानावयास ही हरकत दिसत नाही. ते म्हणतात त्याप्रमाणे गीतेच्या पहिला अध्यायात (आणि फार झाले तर दुसऱ्या अध्यायात) गीतेचा उपदेश संपतो असे म्हणावयास हरकत नाही. गीतेच्या इतर अध्यायांत भक्तियोगाची अथवा भागवत संप्रदायाची छाया कशी पडत गेली ह्याविषयावरही विचार केलेला आहे. गीतचिकित्सेच्या तेराव्या प्रकरणात, बाराव्या प्रकरणाप्रमाणेच खोलात जाऊन कर्मासंबंधीचा विचारही केलेला आहे. पण ह्यासंबंधी पुढे कधीतरी विचार करता येईल. ग्रंथाच्या उपसंहारात गीता-रहस्यकारांनी कौरव-पांडव युद्ध हा समर-प्रसंग खरा मानूनच भूमिका घेतली आहे. विनोबांनीही आपल्या गीता-प्रवचनात जवळजवळ अशीच भूमिका घेतली आहे. पण गांधींची भूमिका अशी दिसत नाही. ते लिहितात, " सन १८८८-८९ मध्ये गीतेचे प्रथम दर्शन जेव्हा झाले तेव्हाच मला वाटले की हा ऐतिहासिक ग्रंथ नाही तर त्यात भौतिक युद्धाच्या वर्णनाच्या निमित्ताने प्रत्येक मनुष्याच्या हृदयात निरंतर चाललेल्या द्वन्द्व-युद्धाचेच वर्णन आहे. मानुषी योद्धांची रचना हृदयगत युद्धाला रसिक बनविण्याकरिता उभी केलेली कल्पना आहे. ही प्राथमिक स्फुरणा धर्माचा आणि गीतेचा विशेष विचार केल्यानंतर पक्की झाली... महाभारत ग्रंथ हा मी आधुनिक अर्थाने इतिहास मानत नाही."

(अनासक्ती योग पृष्ठ १६, १७ उपसंहार गी. चि. पान ३६९)

धर्माधिकारी ह्यांचे मत गांधींच्या मताच्या अधिक जवळ येते असे मला वाटते.

माझेही मत जवळजवळ धर्माधिकारींच्या सारखेच आहे. फक्त फरक एवढाच की, गीतेच्या मूळ मताकडे मी तत्त्वज्ञान म्हणून पाहिले नव्हते आणि आजही गीतेचा तत्त्वज्ञान म्हणून विचार करणे वेगळे आणि गीतेकडे महाभारत महाकाव्याचा एक भाग म्हणून पाहणे वेगळे असे मी मानतो. अर्थात ग्रंथ जेव्हा आपल्या संस्कृतीचा भाग होतात तेव्हा अनेक क्षेपके ग्रंथात शिरतात आणि ग्रंथ कुणाचा ह्याचा विचार करण्याची सोय रहात नाही हेही तितकेच खरे. शेवटी एक महत्त्वाची चिकित्सा करून ती ग्रंथरूपाने साकार केल्याबद्दल धर्माधिकारी यांचे अभिनंदन करून हा लेख संपवितो. *

तत्त्वज्ञान विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७

सुरेंद्र बारलिंगे

* **गीताचिकित्सा (श्रीभगवद्‌गीता संशोधन)** ले. भाऊ धर्माधिकारी, प्राज्ञ-पाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी, वाई; प्रथमावृत्ती १९९२; पृष्ठ संख्या १५+३८३; किंमत रु. १०५

# परामर्श : विशेषांक सूची

**(परामर्शच्या काही विशिष्ट विषयांना वाहिलेल्या विशेषांकांची सूची)**

| | किमत रु. |
|---|---|
| १) विटगेन्स्टाइन विशेषांक (खंड ६ अंक, १, मे १९८४) | ८–०० |
| २) मार्क्स विशेषांक (खंड ५ अंक ४, फेब्रु १९८४) | ८–०० |
| ३) मार्क्स आणि भारतीय विचारवत (१) (खंड ७ अंक १, मे १९८५) | १०–०० |
| ४) मार्क्स आणि भारतीय विचारवंत (२) (खंड ७ अंक ४, फेब्रू १९८६) | १०–०० |
| ५) विज्ञानाचे तत्वज्ञान (१) (खंड ८ अंक २, ऑगस्ट १ ८६) | १२–०० |
| ६) विज्ञानाचे तत्वज्ञान (३) (खंड ९ अंक १, मे १९-७) | ८-०० |
| ७) सांख्यदर्शन विशेषांक (खंड ९ अंक , नोव्हेंबर ९८७) | ८–०० |
| ८) स्त्रीमुक्ती : समस्या व दिशा (खंड ११ अंक १, मे ८९) | १५–०० |
| ९) ए. जे. एयर यांचे तत्वज्ञान (खंड १२ अंक १, मे १९९०) | २०–०० |
| १०) तत्वचिंतक ज्ञानेश्वर (खंड १३ अंक १, मे १९९१) | २०–०० |

संपर्क साधा :

**संपादक परामर्श,**
तत्वज्ञान विभाग
पुणे विद्यापीठ
पुणे– ४११ ००७